
# डॉ. बाबासाहेब आंबेडकर

## काल, आज आणि उद्या

प्रकाश उत्तम हनवते

प्रा.डॉ. उत्तम हनवते



Scanned with CamScanner

Edi. Prakash Hanwate/Prof. Dr. Uttam Hanwate

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर : काल, आज आणि उद्या

संपादक : प्रकाश हनवते / प्रा.डॉ. उत्तम हनवते

**सर्व हक्क संपादकिय**

**प्रकाशक :** निसर्ग पब्लिकेशन, "स्वरशिल्प" नाईकनगर, हिंगोली.

**भ्रमणध्वनी :** ०९४२२१७९४६१

pavanprakashan@gmail.com

**प्रथम आवृत्ती** : ११ जुलै २०१६

**मुद्रक** : डेल्टा प्रिंटर्स, पूणे

**अक्षर जुळवणी** : **पत्की झेरॉक्स ॲण्ड कॉम्प्युटर,**
**मुकूंद मधुकरराव पत्की,**
**भाजी मंडी रोड, जिंतूर, जि. परभणी - ४३१ ५०९**
**मो. [illegible]**

६१. प्रा.डॉ. सर्जेराव भांमरे, नंदुरबार.... डॉ. बाबासाहेब आंबेडकर व सत्याग्रह/२४५
६२. प्रा.डॉ. दिलीप कदम, मारवड.... डॉ. आंबेडकर व्हेन वील ॲनिहिलेशन ऑफ कास्ट डज ?/२४९
६३. प्रा. निलेश राऊत, बुलढाणा..... शिक्षणतज्ञ डॉ. आंबेडकर/२५३
६४. प्रा. सुधाकर निळे, प्रवरानगर.... डॉ.आंबेडकरांच्या अस्पृश्योधार चळवळीतील समाज समता दलाचे योगदान/२५५
६५. डॉ. आंबेडकरांनी दिलेल्या २२ प्रतिज्ञा/२५८
६६. माधुरी तारदाळकर, बारामती...... नवे कर्मकांड(कविता)/२५९
६७. प्रा.डॉ. लदाफ एस.के., औसा..... डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कामगार विषयक धोरण/२६०
६८. प्रा.डॉ. रविंद्र विखार, कुरखेडा..... डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्री विषयक कार्य/२६३
६९. प्रा.डॉ. महादेव मुंडे, पाटोदा...... महाराष्ट्रातील दलित चळवळ आणि डॉ. आंबेडकर/२६९
७०. प्रा. प्रकाश गायकवाड, पाटोदा..... डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राजकिय विचार/२७२
७१. प्रा. यादव घोडके, पाटोदा..... डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जातीव्यवस्था विषयक विचार/२७५
७२. विजयकुमार काकडे, नांदेड...... डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे समग्र क्रांतीचे विचार/२८३
७३. प्रा.डॉ. राजु कोंडेकर, नांदेड...... जातीव्यवस्था व अस्पृश्यता विषयक डॉ. आंबेडकरांचे विचार/२८७
७४. प्रा.डॉ. मिलिंद भिलपवार, दर्यापुर.... डॉ. आंबेडकर यांच्या विचारांचा मराठी साहित्यावरील प्रभाव/२९०
७५. प्रा. डॉ. विनोद गायकवाड, शेगाव.... बाबासाहेब-संविधान आणि लिंग भेद/२९२
७६. प्रा. एन.डी. नाईक, शिरसाळा..... डॉ. आंबेडकरांचे शैक्षणिक विचार/२९६
७७. प्रा.डॉ. विलास फरकांडे, काटोल.... डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि राष्ट्रवाद/३००
७८. प्रा.डॉ. संजय ढवळे, मोहपा..... डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कृषी विषयक विचार/३०२
७९. प्रा.डॉ. राजेंद्र धाये, घनसावंगी..... डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि लोकशाही/३०५
८०. प्रा. स्मिता पाटील, इचलकरंजी....... डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक कार्य/३१८
८१. प्रा.डॉ. आनंद आवटी, देऊळगाव राजा..... डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि लोकशाही/३२३
८२. प्रा. डी.बी. ताडेराव, फोंडाघाट..... डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि मातंग समाज/३२९
८३. प्रा. ताराचंद कंठाळे, यवतमाळ..... सामाजिक लोकशाहीचे मेरुमणी डॉ. आंबेडकर/३३२
८४. प्रा.डॉ. लक्ष्मीकांत जिरेवाड, बीड.... विद्युत नियोजनाचे जनक डॉ. बाबासाहेब आंबेडकर/३३४
८५. प्रा.डॉ. विलास मकदुम, इचलकरंजी..... डॉ. भिमराव रामजी आंबेडकरांचे शैक्षणिक विचार व कार्य/३४०
८६. प्रा.डी.बी. ताडेराव, फोंडाघाट...... डॉ. आंबेडकराचे नाग-अस्पृश्य विषयक विचार/३४५
८७.प्रा.डॉ. एन.जी. भद्रे, अर्जापुर...... डॉ. आंबेडकरांचा श्रीलंका दौरा/३४९
८८. प्रा.डॉ. अनिल काळबांडे, मुळावा....... डॉ. आंबेडकर आणिआदिवासी विकास/३५२
८९. प्रा.डॉ. ममता इंगोले, पातुर..... डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्री विषयक विचार/३५७
९०. प्रा. माधव कांबळे, जळकोट.... डॉ. आंबेडकरांच्या जाती अंताच्या लढयातील एक सैराट पाऊल/३६७

Scanned with CamScanner

# ८४. विद्युत नियोजनाचे जनक डॉ. बाबासाहेब आंबेडकर

प्रा.डॉ. लक्ष्मीकांत जिरेवाड,
बलभीम महाविद्यालय, बीड.

**प्रस्तावना :-**

भारताच्याच नाही तर जगाच्या इतिहासात अजरामर ठरलेली काही युगपुरूष काही प्रज्ञावंत काळालाही जिंकून गेले. अशा तेजस्वी युगप्रवर्तक मानवांच्या इतिहासात एक नाव असे आहे की, ज्या नावाची स्मृती युगानयुगे तेवत राहील. ते नाव आहे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, आधुनिक भारताची जडणघडण, भारताच्या विद्युत व्यवस्थेची बांधणी ज्यांच्या कर्तृत्वाने झाली ते अभूतपूर्व व्यक्तिमत्त्व म्हणजे बाबासाहेब आंबेडकर होय. एकविसाव्या शतकाकडे झेप घेत असताना 1980 नंतरच्या जागतिक घडामोडीकडे दृष्टिक्षेप टाकताना असे लक्षात येते की, जगात लोकसंख्या, लोकांच्या अपेक्षा आणि ज्ञानाचा विस्फोट झालेला आहे. अशा या जागतिक समस्येच्या परिभ्रमणातून मुक्ती मिळविण्यासाठी मानवी जीवनाच्या चिंतनाचे मूल्य लक्षात घेता, मानवी जीवनात सत्य, प्रेम, ज्ञान व न्याय या चतुःसूत्रांना अत्यंत मानाचे स्थान असणे अपरिहार्य आहे. त्याच बरोबर जल, विद्युत, विज्ञान व तंत्रज्ञानाची ही जोड विकासाच्या जडणघडणीत आवश्यक बाब आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणजे विविध पैलूंनी बहरलेले व्यक्तिमत्व होय. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कर्तृत्वच इतके महान आहे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारखे पुरूष जन्माला येणे म्हणजे त्या त्या देशाच्या जिवंतपणाचे लक्षण होय. त्यांनी युगप्रवर्तक धम्मक्रांतीचे कार्य रक्ताचा एक थेंबही न सांडता घडवून आणले. थोडक्यात सांगावयाचे झाल्यास आंबेडकर या शब्दाचा अर्थ `सर्वांचे सर्व हीत` होय.

राष्ट्रनिष्ठा, देशप्रेम हे बाबासाहेबांच्या जाज्वल्य जीवनकार्याचे अतूट अंग आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य हे कोणत्याही विशिष्ठ क्षेत्रापुरते मर्यादित नव्हते तर प्रत्येक क्षेत्रात त्यांचे योगदान हे त्या-त्या क्षेत्रासाठी सर्वोच्च योग्य मार्गदर्शन म्हणून आज सिद्ध झालेले आहे. डॉ. आंबेडकर हे केवळ एक व्यक्ती नसून विचार आहे. त्यांचे कार्य हे तळागाळातील हजारो वर्षांचा सामाजिक अन्याय व आर्थिक शोषणामुळे भरडलेल्या लोकांकरिता प्रेरणा आहे. ही प्रेरणा केवळ वैचारिक पातळीपुरती मर्यादित नाही तर झोपलेल्या समाजाला जागृत करून त्यांच्यात स्वाभिमान, अस्मिता आणि आर्थिक सबळता निर्माण करण्याचा कृती कार्यक्रम आहे. म्हणुन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे गौरवउद्‌गार काढतांना प्रा. डॉ. उत्तम सावंत असे म्हणता येईल की, आपल्याला प्रशांत महासागराची खोली मोजता आली, हिमालय पर्वताची उंची मोजता आली परंतु, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संपादन केलेल्या ज्ञानाची, वैचारिक पातळीची कुणालाही खोली व उंची मोजता आली नाही येणारही नाही. अशा या महामानवांनी जल विद्युत निर्मीती क्षेत्रामध्ये केलेले जे भरीव कार्य आहे. ते आजच्या विज्ञान युगात आदर्शवत ठरणारे आहे.

## 1) नद्यांच्या पाण्यापासुन विद्युत निर्मीती नियोजन :-

भारताला आत्याधुनिक व प्रगतीशिल राष्ट्र बनविण्यासाठी ज्या ज्या व्यक्तींनी, समाज सुधारकांनी जे प्रयत्न केले त्यापैकी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा राष्ट्रीय नेते म्हणून अग्रक्रमाने विचार करावा लागतो. मग ते पाण्यासाठी नद्या जोड प्रकल्प असो, शेतजमीनीचे प्रश्न असो किंवा दिवसेंदिवस जाणवणाऱ्या विजेचा प्रश्न असो याचा आपण गांभीर्याने विचार केला नाही तर देशाची अधोगती व्हायला वेळ लागणार नाही. या समस्याचे महत्व व ते सोडविण्याचे उपाय डॉ. आंबेडकरांनी स्वातंत्र्यापूर्वीच ओळखले होते. असे प्रश्न भविष्यकाळामध्ये निर्माणच होऊ नये त्याचे नियोजन आणि व्यवस्थापनही त्यांनी केले होते.



Scanned with CamScanner

भारतामध्ये बारा महिने वाहणाऱ्या नद्या असूनही त्यातील पाण्याचा कधीही उपयोग केला नव्हता. या नद्यांच्या पुरामुळे हाजारो लोकांची जिवीत वित्त हानी होत होती. हे डॉ. आंबेडकरांनी मंत्रीपदाची 1942 मध्ये सुत्रे हाती घेताच त्यावर प्रभावी उपाययोजना म्हणुन नद्यांच्या पाण्याचे नियोजन करण्यावर भर दिला. त्यापैकीच दामोदर नदी प्रकल्प हा एक होय. दामोदर नदीच्या पुरामुळे हजारो लोकांचे दरवर्षी प्राण जात होते. तितकेच पिकांचेही नुकसान होत होते. म्हणूनच त्यांनी या पाण्याच्या नियोजनावर भारतीयांचा सर्वांगीण विकास करण्यावर भर दिला. याद्वारे जलसिंचन, पुरनियंत्रण, जलमार्ग व त्यातून विज निर्मीती करून ते किती फायदेशिर ठरेल म्हणुनच अंमलबजावणी करण्यासाठी प्रयत्न सुरू केले. 1944 साली बंगाल सरकारने स्थापन केलेल्या नदी पुर चौकशी कमिटी या कमिटीसमोर भाषण करतांना डॉ. आंबेडकरांनी पाण्याचे महत्व आणि त्याची उपयुक्तता पटवून दिली. या प्रकल्पास लवकरात लवकर मान्यता मिळण्याची शिफारस केली होती. या पैकी विज निर्मितीच्या बाबतीत व पाटबंधारे विकासाबाबतचे त्यांचे विचार फारसे चर्चिले गेले नाही. परंतु ही धोरण भारताच्या भावी विकासात अत्यंत महत्वाची ठरली. बाबासाहेबांच्या विद्युतधोरणाच्या दूरदृष्टीचा प्रत्यय ओरिसातील नद्यांच्या विकासातून दिसून येतो. ओरिसातील महानदी आणि इतर नद्यांमुळे त्या प्रदेशात हाहाकार माजत होता. त्यांच्या मते 1866 साली दुष्काळामुळे जवळजवळ 40 टक्के लोकांचा मृत्यू झाला. ओरिसातील लोकांच्या आरोग्यात घट होणे, मृत्युमुखी पडणाऱ्यांचे जास्त प्रमाण 19 टक्के विद्यार्थी कुपोषणाचे शिकार होते. 8.7 टक्के लोकांमध्ये विटॅमिनची कमतरता आहे. लोकांचे दरडोई उत्पन्न, उत्पादकता कमी आहे. त्यांच्यामते या सर्व समस्यांतून ओरिसाची सुटका करता येऊ शकते कारण ओरिसाकडे भरपूर मोठ्या प्रमाणात जलसंपदा आहे. तीन मुख्य नद्या मिळून प्रतिवर्षी 9 करोड फुट पाणी समुद्रात जाते. तसेच हे पाणी ओरिसात हाहाकार माजवते. इतर नैसर्गिक संशोधनात लोह, ग्राफाईट, चुनखडी, अभ्रक, इत्यादी नैसर्गिक संसाधने आहेत. यातील महत्वांचे संसाधन म्हणजे पाणी होय. बाबासाहेबांनी असे मत मांडले आहे की एवढ्या मोठ्या प्रचंड जलस्त्रोताला थांबवणे म्हणजे अवघड काम आहे व संकटांना आमंत्रण देणे होय. मात्र बाबासाहेबांना हे संकट वाटत नव्हते तर ती एक संधी आहे. त्यांच्या मते अति पाण्यापेक्षा कमी पाण्यामुळे लोकांना जास्त त्रास होतो. त्यांच्यामते अमेरिकेतही या अति पाण्याच्या समस्या होत्या. परंतु अमेरिकेने या समस्यांमधून मार्ग काढून केवळ पाण्याचेच नियंत्रण केले नाही तर इतरही काही साध्ये पूर्ण केली. महानदीच्या पाण्याच्या साठवणुकीने दहा लाख एकरपेक्षा जास्त जमिनीचे सिंचन होईल आणि प्रचंड मोठ्या प्रमाणात विद्युत निर्मिती करता येईल.

बाबासाहेबांच्या मते महानदीमुळे साठवलेल्या पाण्याची क्षमता मद्रासमधील मटूर जलाशय क्षमतेपेक्षा 30 पट अधिक आहे, तर तुंगभद्रा प्रस्तावित धरणापेक्षा 20 पट मोठी आहे. या योजनेबरोबरच बाबासाहेबांनी ओरिसातील इतर नद्यांच्या सर्वेक्षणाची तयारी दर्शविली होती. त्यांच्यामते अशा पद्धतीने आपण जर काम केले तर एका बाजुला जल नियंत्रण होईल तर दुसऱ्या बाजूने जलविद्युत निर्मिती होऊन संपूर्ण देशाच्या विकासाला हातभर लागेल. बाबासाहेबांच्या जलविद्युत धोरणातून आपल्याला त्यांच्या दूरदृष्टीची कल्पना येते व संपूर्ण भारताचा चेहरामोहरा कसा बदलता येईल, यासाठी त्यांनी प्रयत्नांची कशी पराकाष्ठा केली हे दिसून येते. आधुनिक भारताची पायाभरणी मजबूत होण्यासाठी विजेच्या विकासावर भर देण्याबरोबर विजनिर्मितीसाठी पर्यायी योजनांचा शोध बाबासाहेबांनी घेण्याचा प्रयत्न केला. त्यात अणुउर्जा, जल विद्युत, पवनउर्जा यांचा उल्लेख करावा लागेल. यात जलविद्युत योजना हया बहुउद्देशीय योजना आहेत. जलविद्युत योजनांपैकी दामोदर खोरे योजना आणि महानदी (ओरिसा) योजना यांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल.

दामोदर खोरे योजनेच्या बाबतीत बाबासाहेब म्हणतात की, दामोदर नदीच्या पाण्याचा सदुपयोग भारत सरकारासाठी स्वागत योग्य बाब आहे. ही योजना नदीच्या पाण्याचे योग्य नियंत्रण करण्याची संभाव्यता प्रकट करते. यामुळे पूर नियंत्रण होईल. या योजनेमुळे मोठ्या क्षेत्राचे सिंचन होईल ज्यामुळे दुष्काळापासून मुक्ती होऊन अपेक्षित योजनेमुळे मोठ्या क्षेत्राचे सिंचन होईल ज्यामुळे दुष्काळा पासून मुक्ती होऊन अपेक्षित विजनिर्मिती होईल. जर बंगाल आणि बिहार सरकारांना या गोष्टी समजल्या तर तेही उत्साहाने या योजनेचे स्वागत करतील. दामोदर खोरे योजना केवळ पुराला थांबविण्यासाठी धरण बांधण्यापर्यंतच



Scanned with CamScanner

मर्यादीत ठेवण्यात त्यांना रस नव्हता तर ती एक बहुउद्देशीय योजना असावी, त्यामुळे बंगाल व बिहार प्रांताच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळेल. या योजनेला चालना देण्यासाठी बाबासाहेबांनी एका व्यवस्थेची शिफारस केली जी व्यवस्था या योजनेसंबंधी सांख्यिकीय माहिती गोळा करेल.

एकूणच डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार तर आहेतच व त्याच बरोबर या देशातील **विद्युत व जल नितीचे सुध्दा शिल्पकार** आहेत. तांत्रीक वीज मंडळ, केंद्रीय जल उद्योग, केंद्रीय सिंचन या सर्व तांत्रीक संस्थांच्या निर्मीतीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मोलाचे योगदान आहे.

### 2) **विजविकासासाठी त्रिसूत्री धोरणात्मक उपाययोजना :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विजेच्या उत्पादनासाठी 1942 पासुन प्रयत्न सुरू केले. त्यांच्या मते भारताच्या सर्वांगीण विकासासाठी मोठ्या प्रमाणात विजेची आवश्यकता आहे. त्यासाठी सध्याची यंत्रसामुग्री ही मर्यादीत आहे. आपल्याला मोठी यंत्रसामूग्री व नविन धोरण अवलंबवावे लागेल. याविषयीच्या धोरणाच्या निश्चितीसाठी डॉ. आंबेडकरांनी श्रम मंत्री या पदावरून केलेल्या भाषणातून त्यांची दृष्टी किती व्यापक होती हे लक्षात येते. डॉ. आंबेडकरांनी विजेचे महत्व व तिचे देशाच्या विकासातील योगदान ओळखून स्थानिक विकासापेक्षा प्रादेशिक विकसाला भारत सरकारने महत्व दिले होते. यासाठी इंग्लंडमध्ये मान्यता पावलेल्या ग्रिड पध्दतीचा स्विकार केला होता. या पध्दतीनुसार वीज सेवा ही उत्पादकांना व ग्राहकांना कमीत कमी दरामध्ये तसेच कार्यक्षमपणे मिळावी असे वाटत असेल तर सावधानतापुर्वक इंग्लंडने जशी केंद्रीय वीज मंडळामार्फत त्रिसुत्री धोरणाची अंमलबजावणी केली तसेच आपण धोरण स्विकारले पाहिजे. या त्रिसुत्री धोरणामध्ये पुढील बाबींचा समावेश आहे.

1) वीज पुरवठा हा सार्वजनिक उपक्रम म्हणून सुरू करणे व ज्या प्रदेशात मोठ्या प्रमाणावर उद्योगधंदे आहेत अशा ठिकाणी मोठी वीज निर्मीती केंद्रे स्थापन करणे.

2) मुख्य वितरण व्यवस्था (याला जोडलेले शेती आणि इतर दुरवरील ग्राहाकांना जोडणारी उपवितरण व्यवस्था) अशारितीने विकसित करावी की, मुख्य वितरण व्यवस्था केंद्र मानुन व उपकेंद्रे म्हणून विकसीत करावी.

3) उर्जा नियंत्रणाबाबत ग्रिड अंतर्गत मागणीचे प्रमाणीकरण करण्याचा प्रयत्न त्या त्या प्रदेशामध्ये करण्यात यावा.

ही प्रमुख सुत्रे आहेत. अशा प्रकारे त्रिसुत्री धोरणाचा पुरस्कार केल्यास आपल्या देशात प्रादेशिक विकासासाठी स्वस्त वीज प्रत्येकाच्या घरापर्यंत पोहचविणे शक्य होईल. हा डॉ. आंबेडकरांचा मुळ हेतु होता.

### 3) **अवजड विज उपकरणाची उपलब्धी :-**

विद्युत उर्जा निर्मितीसंबंधी एका प्रश्नांचा विचार सुरवातीलाच करण्याचा माझा मानस आहे. विद्युत उर्जा निर्मितीकरीता आवश्यक सयंत्र, मशिनरी आणि उपकरणे यांच्या उपलब्धतेशी संबंधीत हा प्रश्न आहे. ही सामुग्री बाहेरील देशांमधून मिळवावयाची आहे. विशेषतः ग्रेट ब्रिटनमधून मिळवायची आहे. ही सामग्री मिळविण्याचे मार्ग अडचणीचे आहेत. ग्रेट ब्रिटनचा उत्पादन क्षमतेचा मोठा भाग त्याला स्वतःच्या गरजांकरीता सुरक्षित हवा आहे. ब्रिटीश आणि अमेरिकन बाजारपेठेत तंत्रे आणि संसाधने प्राप्त करण्यास सुरक्षिता हवी आहे. ब्रिटीश आणि अमेरिकन बाजारपेठेत संयंत्रे आणि ससाधने प्राप्त करण्यास युरोपातील आणि आशियातील अन्य देश सुध्दा प्रतिस्पर्धी आहेत. या स्पर्धेत भारताला आवश्यक असलेल्या प्रमाणात साहित्य मिळविण्यास अडचण जाणवू शकते. भारताची अवस्था सुरक्षित करण्यास, भारताने शक्य तितक्या लवकर संयंत्रे आणि संसाधने यांची मागणी नोंदविणे आणि प्राथमिकता प्राप्त करणे याची आववश्यकता भासते. जर या सरकारने युध्द समाप्तीनंतर भारताच्या विद्युतीकरणाकरीता आवश्यक यंत्रसामुग्रीच्या परिपुर्ततेची व्यवस्था करून ठेवली नाही तर हे सरकार आपल्या कर्तव्यपालनात अपयशी ठरेल.

बाबासाहेब बांबी युद्धोत्तर कालावधीत त्वरीत विज उत्पादनासाठी एक योजना प्रस्तुत केली होती. या कार्यवाही अंतर्गत सरकारने अवजड विज उपकरणांच्या प्राप्तीसाठी प्रयत्न सुरू केले. विज उत्पादन क्षमता सुरक्षित करण्यासाठी



Scanned with CamScanner

उपाययोजना सुरू करण्यात आल्या आहेत. एकूण आरक्षीत वीज क्षमता 850 मेगावॅट असेल आणि त्यासाठी जवळजवळ रूपये 50 करोड खर्च येईल. भारताची ही नवीन अनुमानीत विज क्षमता सद्यस्थितीतील क्षमतेच्या तुलनेत 65 टक्क्यांनी जास्त असेल. त्यांच्या मते अधिक अभ्यासाने कदाचित आपल्याला जास्त उपकरणांची आवश्यकता लागेल. भारताच्या हितसंबंधांना जास्त नुकसान न करता आपल्याला या विषयाला लगेच पूर्ण करावे लागेल.

### 4) तांत्रीक विजमंडळाची स्वातंत्र स्थापना :

डॉ. आंबेडकर हे वीज मंडळाची स्थापना करून थांबले नाही तर हे मंडळ अधिकाधिक कार्यक्षम कसे राहील याचीही दक्षता घेतली हे आपणाला डॉ. आंबेडकरांनी वीज मंडळासंबंधी केलेल्या शिफरशीवरून स्पष्ट करता येते. त्यांच्यामते या मंडळाच्या संघटनात्मक रचनेमध्ये एक अध्यक्ष दोन पुर्णवेळ सदस्य, तीन अर्धवेश सदस्य राहण्याची तरतुद केली. या शिवाय भारत सरकारने उर्जा आयुक्त हे या मंडळाचे पदसिध्द अध्यक्ष राहतील. तसेच या मंडळाचे कार्य सुरळीत चालण्यासाठी मंडळाची चार विभागात पुढील प्राणे विभागणी केली होती. 1) उर्जाप्रणालीचे नियोजन 2) उर्जा वापर 3) जनसंपर्क व प्रसिध्दी 4) वित्त व खजिनदार सचिव अशा प्रकारे या मंडळाचे स्वतंत्र चार विभाग करून ते परस्परपुरक ठेवून ते अधिकाधिक कसे कार्यक्षम राहील याचीही दक्षता डॉ. आंबेडकरांनी घेतली होती.

बाबासाहेबांनी 8 नोव्हेंबर 1944 ला भारत सरकारच्यावतीने एक तांत्रिक विज बोर्डाची निर्मिती केली. अध्यक्षाव्यतिरिक्त या बोर्डात पूर्ण वेळ दोन सदस्य असतील. भारत सरकारने श्री मॅथ्यू यांना या बोर्डाचे अध्यक्ष म्हणून नियुक्त केले. एक सदस्य हे अमेरिकेतील श्री. डब्ल्यू. एल. वूरदीन असतील. भारतात येण्यापूर्वी श्री. वूरदीन हे टेनीसी खोरे प्रधिकरण योजनेचे अधिकारी होते. तिसरे सदस्य हे उपयोगिता सदस्य म्हणून काम पाहतील.

भारताच्या भावी विकासासाठी जे धोरणं तयार गेली केली त्याची पाळंमुळ वरील धोरणातून स्पष्ट होतात. बाबासाहेबांनी श्री. वूरदीन यांना बोलावले कारण त्यांना माहीत होते की भारत हा अमेरिकेसारखा खंडप्राय देश आहे. तसेच इंग्लंड हा अत्यंत छोटा देश असून इंग्लंडमधील अभियंत्यांना मोठमोठ्या योजनांमध्ये काम करण्याचा अनुभव नाही. अशा परिस्थितीत अमेरिकेतील मोठमोठ्या योजनांमध्ये काम करणारे श्री. वूरदीन हे व त्यांचा अनुभव भारतासाठी आवश्यक आहे. बाबासाहेबांपुढे केवळ भारताचे हित होते. त्यासाठी ते कोणाचीही मदत घ्यायला तयार होते.

### 5) विज अभियंत्यांचे संमेलन :

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या संमेलनात अध्यक्ष पदावरून बोलताना आंबेडकरांनी प्रथमतः युद्धानंतरच्या कालावधीत सरकारने विजेच्या विकासासाठी काय प्रयत्न केले, या विषयीचा दृष्टीकोण स्थापीत केला. युद्धानंतर लगेच सरकारने प्रमुख सरकारी आणि सरकारेत्तर अभियंत्यांची बैठक बोलावली. या संमेलनात युद्धोत्तर भारतात विजेच्या विकासाठी अवजड विज उपकरणे विकासासंदर्भात कार्यक्रम तयार केला. एखाद्या अनुभवी अभीयंत्याची नियुक्ती करण्याचे प्रयत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सुरू ठेवले होते. उच्च-स्तरीय विरोष तज्ञांच्या नियुक्तीचे भारत सरकार तांत्रिक संगठन मजबूत करण्यासाठी कटीबद्ध आहे. बरोबरच या संमेलनात काही प्रस्ताव पास केले ते प्रस्ताव पुढील प्रमाणे.

1) विविध प्रांतामध्ये आणि संस्थान अधिकार क्षेत्रात येणाऱ्या प्रदेशांमध्ये विजेच्या विकासासंबंधी काही शिफाशी आणि सूचना प्रस्तावित करण्यात आल्या.

2) या प्रदेशांमध्ये विजेच्या विकासासाठी तांत्रिक बोर्ड स्थापन करावेत.

3) सर्वमताने संमेलनात असे ठरले की भावी विज विकासाच्या दृष्टीने या क्षेत्राचा अभ्यास करून संशोधन करावे.

4) चौथा प्रस्ताव हा रेल्वे विद्युतीकरण, खत निर्मिती आणि ग्रामीण विद्युतीकरणाशी संबंधीत होता. म्हणजे चौथा प्रस्ताव ही ग्रामीण भारताच्या विकासावर केंद्रीत करण्यात आला. या संमेलनातील सदस्यांनी स्वतःच्या शिफारस पत्रात म्हटले की, ``हि पहिली वेळ आहे की, विजेच्या विकासाच्या कार्यक्रमाबाबतीत सर्वांगीण विचार करून सर्व क्षेत्रांतील अनुभवी अभियंत्यांच्या



Scanned with CamScanner

उपस्थितीत प्रादेशिक विज विकास गरजांचे मुल्यांकन मोठ्या प्रमाणात उपयोगी सिद्ध झाले. यात संपूर्ण भारताचा विविध स्थितीतील सर्वांगीण अनुभव समाविष्ट झाला आहे.''

वरील संमेलनातील बाबींवरून हे लक्षात येते की भारताच्या भावी सर्वांगीण विकासाच्या दृष्टीकोनातून मुहुर्तमेढ रचविण्याचे कार्य बाबासाहेबांनी केले.

## 6) केंद्रिय वीज प्राधीकरणाची स्थापना :-

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतातील वीजेची समस्या सोडविण्यासाठी 8 नोव्हेंबर 1944 साली स्वतंत्र केंद्रीय वीज प्राधिकरणाची (Cetral Electricity Authority) स्थापना केली. भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी वीजेची आवश्यकता व महत्व किती आहे हे डॉ. आंबेडकरांनी पटवून दिले. स्वातंत्र्यानंतरचे भारत सरकारचे वीज धोरण व जलधोरण जे आज कार्यान्वित आहे ते 1942-46 या काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या वीज प्राधिकरणापासूनच निर्माण झाले आहे. यातून आपणाला डॉ.आंबेडकरांचा दुरदृष्टीकोन कसा होता हे स्पष्ट होते.

## 7) वीज वापराविषयी जनतेमध्ये प्रचार व प्रसाराचा कार्यक्रम :-

देशाला औद्योगीकदृष्ट्या परिपूर्ण करावयाचे असेल तर वीजेशिवाय पर्याय नाही. भारतीय समाजव्यवस्थेवर अंधश्रध्दा, रूढी, प्रथा आणि परंपरेचा जो प्रभाव आहे त्यातून तो बाहेर पडल्याशिवाय वीजेचे महत्व तिचा वापर तिची आवश्यकता पटवून देण्यासाठी स्वतंत्र प्रचार आणि प्रसार मोहिम राबविण्याचा कार्यक्रम सुचविलेला आहे. त्यामध्ये -

1) वीज निर्मिती, वीज पुरवठा व वीजेच्या प्रश्नाबाबत संशोधन करणारी तिचे प्रमाणिकरण करणारी, तपासणी करणारी संशोधन संस्था स्थापन करणे.

2) वेळोवेळी वीज वापर वाढावा यासाठी वीज विषयक माहितीचा प्रचार व प्रसार करणाऱ्या कार्यक्रमाचे आयोजन करणे.

3) गरज असेल त्या प्रमाणे राज्यांना मोठ-मोठे वीज प्रकल्प निर्माण करण्यासाठी सर्वोतोपरी मदत आणि सहकार्य करणे. 4) भारतीय तंत्रज्ञान प्रशिक्षण देण्यासाठी विदेशीय संस्थांमध्ये सरकारी खर्चाने विदेशात पाठवून त्यांना वीज व्यवस्थापन, वीज पूरवठा आणि वीज विभागाच्या वाणिज्य बाजूचा अभ्यास करण्यासाठी प्रेरित करणे.

विद्युत व्यवस्थापन आणि निर्मीतीमध्ये डॉ. आंबेडकरांनी महत्वपूर्ण पुढाकार घेतला होता. तसेच वीज निर्मीती व विकासाच्या योजना राज्य व प्रांतिक सरकारच्या सहाय्याने निश्चित करण्यावरही भर दिला. ऑक्टोबर 1943 ते फेब्रुवारी 1945 मध्ये डॉ. आंबेडकरांनी व त्याच्या विभागाने केलेल्या कठोर परिश्रमातूनच आजचे वीज धोरण विकसित झाले आहे. परिणामी 1948 चा भारतीय वीज पूरवठा कायदा निर्माण होऊन लागू करण्यात आला. या कायद्याने वीज पूरवठा वीज उत्पादन या बाबतची जागृतीकरून वीज विकासाबाबतची चौकट उपलब्ध करून दिली. अशाप्रकारे डॉ. आंबेडकरांनी विद्युत धोरणावरच आपले विचार व्यक्त करून थांबले नाही तर त्यासाठी स्वतंत्र भारतात विद्युत मंडळाची रचना कशी असावी या बद्दलही त्यांनी मोलाचे मार्गदर्शनही केले आहे.

## 8) भारतीयांना विज प्रशिक्षणासाठी विदेशात पाठवीने :-

बाबासाहेबांना हे माहित होते की भारतात वीज विकासासाठी अभियंत्यांकडे आवश्यक ते कौशल्य आणि अनुभव असू शकत नाही. कारण आपण आत्ताच विकासाला सुरूवात केली आहे, परंतु आपण भारतीय तज्ञांना परदेशात पाठवून तेथील तंत्रज्ञान आत्मसात करून त्याचा उपयोग भारतासाठी करू शकतो. त्यासाठी सरकारकडून हा प्रस्ताव पास करवून घेतला की भारतीय तज्ञाना वीज प्रशिक्षणासाठी परदेशात पाठवावे. बाबासाहेबांच्या संघर्षातून निर्माण झालेल्या अनुभवाचा प्रत्यय येथे येतो की आपणाकडे एखादे विशिष्ट कौशल्य नाही म्हणून रडत बसण्यापेक्षा ते मिळविण्यासाठी निकराने प्रयत्न करणे हे आपले ध्येय असले पाहिजे.



Scanned with CamScanner

**निष्कर्ष :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे विद्युत निर्मीतीचे जनक असुन ते वेगवेगळ्या युक्ती प्रयुक्तीचा अवलंब करून भारताला विद्युत निर्मीती व स्वावलंबी बनविण्यासाठी आहोरात्र परिश्रम करून यशाच्या शिखरावर पोचवण्याचे काम केले. जगाच्या पटलावर भारताचा विचार करता विज्ञान युगामध्ये भारत हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रयत्नातुन विज्ञान व तंत्रज्ञानात प्रगतशिल देश म्हणुन नावारूपाला आलेला दिसुन येतो. त्यासाठी जागतीक महामार्गदर्शक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या बौद्धिक कौशल्याविषयी व परिपक्वतेविषयी आपल्याला असे म्हणता येईल की, एक दिवस असा येईल की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विश्वलक्ष्यी विचारविश्वाची (Discourse) महत्ता जगातील एकूनच सर्व जानकारांच्या लक्षात येईल आणि क्रांती या शब्दाचा पर्याय म्हणून लोक `आंबेडकर` या शब्दाचा वापर करतील. आंबेडकर म्हणजे क्रांती असे लोक परस्परांना सांगतील. आंबेडकर म्हणजे ग्लोबल क्रांती सिध्दांत अशी मांडनी जगातील विचारवंत करतील. डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे विचारविश्व जगातील विचारवंतांच्या लक्षात मात्र आनुन देण्याची गरज आहे.

**संदर्भ :-**


(1) भारताचे संविधान (संपादित) : महाराष्ट्र राज्य लेखन व सामुग्री - 6 वी आवृत्ती 2006.

(2) पाक्षीक लोकराज्य : ऑक्टोबर 2006 - म.रा. मुंबई.

(3) थोरात सुखदेव : बाबासाहेब आंबेडकर - नियोजन, जल व विद्युत विकास भूमिका व योगदान , पुणे 2005.

(4) काळे खंडेराव (संपा.) : डॉ. आंबेडकरांचे विविध दृष्टीकोन - लोकसाहित्य प्रकाशन औरंगाबाद - जुन 2012.

(5) डॉ. बाबासाहेब आंबेडकर : संपूर्ण वाङमय, खंड सप्टेंबर 2002, भारत सरकार, नई दिल्ली 110001.

(6) मून वसंत : डॉ. बाबासाहेब आंबेडकर , National Book Trust, India, New Delhi - 110070.


* * *



Scanned with CamScanner